राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीची (CDC) सभा दिनांक 08/07/2019 रोजी संपन्न झाली त्याचे इतिवृत्त खालील प्रमाणे.

विषय क्र. 1 – मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे बाबत
ठराव क्र- 1 – समितीच्या मागील सभेचे प्रोसिडींग समितीचे सचिव प्र. प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी वाचून दाखवले व ते कायम करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. कोरे एस. एम.
अनुमोदक : डॉ. बरकडे जे. डी.

ठराव एकमताने मंजूर

विषय क्र. 2 – आर्थिक वर्ष 2018-19 च्या जमाखर्चास मंजूरी देणेबाबत विचार विनिमय करणे.
ठराव क्र. 2 – सन 2018-19 या वर्षामध्ये महाविद्यालयाकडून झालेल्या जमाखर्चाचे तपशीलवार वाचन प्र. प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी केले. त्याप्रमाणे झालेल्या जमाखर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खैरमोडे एच. एल.
अनुमोदक : श्री. खरमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 3 – सन 2019-20 या आर्थिक वर्षातील अंदाजपत्रकास मान्यता देणे बाबत चर्चा करणे
ठराव क्र. 3 – महाविद्यालयाच्या सन 2019-20 या वर्षात अंदाजीत होणाऱ्या जमाखर्चावर सभेमध्ये चर्चा करण्यात आली. त्यानुसार संभाव्य अंदाज पत्रकानुसार खर्च करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.
अनुमोदक : श्रीमती पोळ एस. एच.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. 4 – स्टार कॉलेज प्रस्तावाबाबत विचार विनिमय करणे.
ठराव क्र. 4 – महाविद्यालयातर्फे स्टार कॉलेज साठी प्रस्ताव तयार करण्यात आला व तो युजीसी, दिल्ली यांना सादर केलेबाबत सविस्तर चर्चा सभेमध्ये करण्यात आली. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने

Scanned with CamScanner

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: श्री. खरटमोल आर. एम.

अनुमोदक: श्री. खैरमोडे एच. एल.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 5 – बॅचलर ऑफ व्होकेशनल कोर्स साठी ऑनलाइन अर्ज करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 5 – महाविद्यालयातर्फे बॅचलर ऑफ व्होकेशनल कोर्स सुरु करणे साठी दिनांक 11/07/2019 रोजी ऑनलाइन अर्ज केला. या कोर्स अंतर्गत महाविद्यालयात सुरु होणाऱ्या संभाव्य पदवी, पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमा बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. त्याअनुषंगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता तसेच इतर सुविधा उपलब्ध करुन देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक: श्री. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्रमांक – 6 – शासनाने मंजूर केलेल्या तासिका तत्वावरील पदे भरणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. – 6 – शासनाने महाविद्यालयातील रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र या विषयांच्या मंजूर पदासाठी तासिका तत्वावर नेमणूकी करणेस मंजूरी देणे बाबत सभेमध्ये चर्चा करण्यात आली. त्यानुसार शासकीय नियम व आदेश तसेच निकष व आरक्षण संबंधी शासन आदेशाचे तंतोतंत पालन करुन दिनांक 13/08/2019 रोजी मुलाखतींचे आयोजन करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: श्री. खैरमोडे एच. एल.

अनुमोदक: डॉ. कोरे एस. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 7 – महाविद्यालयाच्या AQAR सादरीकरणाबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 7 – महाविद्यालयाचा वार्षिक गुणवत्ता हमी अहवाल सादर (Continue) करणेसाठी तयार झालेला असल्याने तो नॅक, बेंगलोरला सादर करणे बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली

त्यानुसार महाविद्यालयाच्या AQAR ऑनलाईन सादर करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.
अनुमोदक : श्री. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 8 – महाविद्यालयातर्फे सुरु करण्यात आलेल्या पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थी संख्येबाबत चर्चा करणे

ठराव क्र. 8 – महाविद्यालयात पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यात आलेअसून त्याची विद्यार्थी संख्या वाढीसाठी आवश्यक त्या उपाय योजना, जाहिरात करणे बाबत सभेमध्ये चर्चा करण्यात आली. प्रशिक्षकाच्या मानधना बाबत सुद्धा चर्चा झाली त्या-अनुषंगाने सदर खर्चास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खैरमोडे एच. एल.
अनुमोदक : डॉ. बरकडे जे. डी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र. 9 – महाविद्यालयात प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. 9 – महाविद्यालयात प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे बाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्या बाबत योग्य त्या ठिकाणी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणेसाठी प्रस्ताव पाठविणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. बरकडे जे. डी.
अनुमोदक : श्री. निकम बी. टी.

ठराव सर्वानुमते मंजूर

(13)

# सूचना

दिनांक १५/०५/२०१८

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध च्या महाविद्यालय विकास समितीची सभा मंगळवार दिनांक २०/०५/२०१९ रोजी आयोजीत केली आहे तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे. वेळ सकाळी ठिक ११:०० वा.

| | | |
|---|---|---|
| 1) आदरणीय श्रीमंत गायत्रीदेवी भगवंतराव पंतप्रतिनिधी राणीसाहेब औंध. | चेअरमन | [signature] |
| २) श्री. कणसे प्रदिप आबासो | सदस्य | [signature] |
| ३) डॉ. कोरे शशिकांत मल्लाप्पा | सदस्य | [signature] |
| 4) डॉ. तरकडे जगन्नाथ दगडू | सदस्य | [signature] |
| 5) श्रीमती पोळ शुभांगी हणमंत | सदस्य | [signature] |
| 6) श्री. खरमोरे राजेश मारुती | सदस्य | [signature] |
| 7) श्री. खैरमोडे हणमंत लक्ष्मण | सदस्य | [signature] |
| 8) ॲड. श्री. क्षिरसागर अतुल रामचंद्र | सदस्य | [signature] |
| 9) श्री. माने राजेंद्र चंद्रकांत | सदस्य | [signature] |
| 10) श्री. कुंभार चंद्रकांत शंकर | सदस्य | [signature] |
| 11) प्रा. तांबोळी रुख्सूम अल्लाबक्ष | सदस्य | [signature] |
| 12) श्री. निकम वी.टी. | सदस्य | [signature] |
| 13) श्री. माने ए. एस. | सदस्य | [signature] |
| 14) डॉ. भंडारे एस. जे. | सचिव | [signature] |

Scanned with CamScanner

## — सभेपुढील विषय —

1) विघ्नेश सेंटरप्रायझेस, मुंबई यांच्या चकीत बीलाबाबत विचार विनिमय करणे
2) स्पोर्टस् किट खरेदी करणेबाबत विचारविनिमय करणे
3) विद्यापीठांतर्गत कुस्तीस्पर्धा (नियोजित) बाबत विचार विनिमय करणे
4) महाविद्यालयातील विभागांना इंटरनेट सुविधा पुरविणेबाबत चर्चा करणे.
5) अर्थशास्त्र या विषयाच्या एम.ए. अभ्यासक्रम सुरु करणेबाबत विचार करणे
6) भौतिकशास्त्र विषयासाठी शिक्षक नेमणे (CHB) बाबत विचार विनिमय करणे
7) पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील मुलांच्या निवासाची सोय होणे बाबत चर्चा करणे
8) महाविद्यालयाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या छत गळती बाबत चर्चा करणे
9) ऑफीस साठी नविन सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत चर्चा करणे
10) महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता हमी कक्ष अहवाल सादर (online) करताना येणाऱ्या समस्यांवर चर्चा करणे
11) महाविद्यालयात नविन नियतकालीके सुरु करणेबाबत चर्चा करणे
12) ग्रंथालयाच्या आवश्यक मागण्यांबाबत विचार विनिमय करणे.
13) पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रासाठी पुस्तके खरेदी करणेबाबत चर्चा करणे.
14) महाविद्यालयाच्या सुरक्षा रक्षकांच्या पगारवाढीबाबत चर्चा करणे
15) सेवानिवृत्ती प्रस्ताव पाठविणेबाबत विचार विनिमय करणे
16) महाविद्यालयाच्या स्टेजसमोर पेव्हर्स ब्लॉक बसवणे बाबत चर्चा करणे व इमारतीच्या टेरेसला वॉटरप्रुफींग करणेबाबत चर्चा करणे.

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समिती (CDC) ची सभा दिनांक 20/08/2019 रोजी संपन्न झाली त्याचे इतिवृत्त खालील प्रमाणे

विषय क्र: 1 – विघ्नेश इंटरप्रायझेस, मुंबई यांच्या थकीत बीला बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र: 1 – विघ्नेश इंटरप्रायझेस, मुंबई यांचे थकीत बील देण्याबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर बील अदा करणेबाबत खात्यांवरील शिल्लक रक्कम व चालू शैक्षणिक वर्षात होणाऱ्या (बँक सहित) खर्चाचा ताळमेळ घालून देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: श्री. खैरमोडे एच. एल.
अनुमोदक: डॉ. माने आर. सी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 2 – स्पोर्टस् कीट खरेदी करणे बाबत विचार विनिमय करणे

ठराव क्र. 2 – महाविद्यालयाच्या क्रिडा विभागातील सहभागी विद्यार्थ्यांच्यासाठी स्पोर्टस् कीट खरेदी करणेबाबत सभेमध्ये विचार विनिमय करण्यात आला. त्यानुसार या शैक्षणिक वर्षामध्ये जमा झालेल्या स्पोर्टस् फी मधून सदर कीट खरेदी करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: डॉ. भंडारे एस. जे.
अनुमोदक: डॉ. बरकडे जे. डी.

विषय क्र. 3 – विद्यापीठांतर्गत नियोजीत कुस्ती स्पर्धा बाबत विचार विनिमय करणे

ठराव क्र. 3 – शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांनी महाविद्यालयास यावर्षी विभागीय कुस्ती सामने घेण्यास अनुमती दिलेली असून सदर सामने महाविद्यालयाच्या क्रिडांगणावर घेण्यास व आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक: श्री. खरटमोल आर. एम.
अनुमोदक:

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

विषय क्र : 4 – महाविद्यालयातील विभागांना इंटरनेट सुविधा पुरविणेबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र : 4 – महाविद्यालयातील कला व विज्ञान विभागासाठी इंटरनेट सुविधा महाविद्यालयातर्फे देणेबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली तथापि इंटरनेट सुविधा वाय फाय तंत्रज्ञानाने उपलब्ध करून देणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : प्रा. तांबोळी आर. ए.
अनुमोदक : डॉ. भंडारे एस. जे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र : 5 – अर्थशास्त्र या विषयाच्या एम.ए. अभ्यासक्रम सुरू करणे बाबत विचार विनिमय करणे

ठराव क्र : 5 – महाविद्यालयामध्ये अर्थशास्त्र विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करणे बाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार सदर अभ्यासक्रम सुरू करणेबाबत पुढील शैक्षणिक वर्षामध्ये पुन्हा चर्चा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. कोरे एस. एम.
अनुमोदक : डॉ. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र : 6 – भौतिकशास्त्र या विषयासाठी तासिका तत्वावर प्राध्यापकाची नेमणूक करणे बाबत विचार विनिमय करणे

ठराव क्र : 6 – महाविद्यालयातील बी.एस्सी. भाग-3 भौतिकशास्त्र या विनाअनुदानित तुकडीसाठी तासिका तत्वावर सहाय्यक प्राध्यापकाची नेमणूक करणेच्या आवश्यकते बाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही सभा तासिका तत्वावर एका सहाय्यक प्राध्यापकाची नेमणूक करण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. खैरमोडे एच. एम.
अनुमोदक : डॉ. भंडारे एस. जे.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र : 7 – पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील मुलांच्या निवासाची सोय होणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ७ – महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राच्या मुलांची निवासाची सोय करणेबाबत या सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही सभा सदर मुलांच्या निवासाची सोय त्यांच्याजातखर्चावर (संस्थेच्या इमारती व्यतिरिक्त) करणेस मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. कोरे एस. एम.

अनुमोदक : डॉ. बरकडे जे. डी

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ८ – महाविद्यालयाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याच्या छत गळतीबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ८ – महाविद्यालयाच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्याचे छत गळत असल्याने वर्गामध्ये पाणी साठत असून मुलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे मा. प्र. प्राचार्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. यामुद्द्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही सभा सदर परिस्थितीची पहाणी करणे व खर्चाचा आढावा घेणेसाठी संबंधित कॉन्ट्रॅक्टर यांच्याशी संपर्क साधून कार्यवाही करणेस मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. निकम बी. टी

अनुमोदक : श्री. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र : ९ – ऑफिससाठी नविन सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत चर्चा करणे

ठराव क्र : ९ – महाविद्यालयाच्या कार्यालयासाठी नविन कॉम्प्युटर सॉफ्टवेअर खरेदी करणे व त्याची अंदाजे रक्कम यावर सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार ही सभा या वर्षीचा सध्याचा खर्च पहाता पुढील शैक्षणिक वर्षामध्ये सदर सॉफ्टवेअर खरेदी करणे बाबत पुनर्प्रस्ताव सादर करण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस जे.

अनुमोदक : श्री. खैरमोडे एच. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र: १० – महाविद्यालयाचा शैक्षणिक गुणवत्ता हमी अहवाल ऑनलाईन सादर करताना येणाऱ्या समस्यावर चर्चा करणे

ठराव क्र: १० – महाविद्यालयाचा AQAR ऑनलाईन सादर करताना येणाऱ्या

Scanned with CamScanner

अडचणी मा. प्रा. डॉ. भंडारे एस. जे. यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिल्या. तसेच सदर अहवालही सभेपुढे सादर केला. समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व तांत्रिक अडचणींवर मात करणेसाठी ही सभा योग्य ती कार्यवाही करणेस मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खरटमोल आर. एम.
अनुमोदक : डॉ. भंडारे एस. जे.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र : ११ – महाविद्यालयात नविन नियतकालिके सुरु करणेबाबत चर्चा करणे.
ठराव क्र : ११ – महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये नविन नियतकालिके सुरु करणेबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार या शैक्षणिक वर्षामध्ये नविन निवडक नियतकालिके सुरु करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.
अनुमोदक : डॉ. कोरे एस. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर.

विषय क्र : १२ – ग्रंथालयाच्या आवश्यक मागण्यांबाबत विचार विनिमय करणे
ठराव क्र : १२ – महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या विविध मागण्या (पुस्तके, रीडींग रुम व लायब्ररी यांचेमध्ये दरवाजा बसविणे, कपाटे मागवणे) बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ही सभा ग्रंथालयासाठी जमा झालेल्या निधीतून नितांत गरजेच्या बाबी खरेदी करण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. बरकडे जे. डी.
अनुमोदक : श्री. निकम बी. टी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र : १३ – पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रासाठी पुस्तके खरेदी करणे
ठराव क्र : १३ – महाविद्यालयातील श्रीमंत चाऊशिराजे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांतर्गत सुरु असलेल्या पोलिस भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रामध्ये असलेल्या मुलांसाठी पुस्तके खरेदी करणेबाबत सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यात आली त्यानुसार आवश्यक असणारी पुस्तके खरेदी करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 14 – महाविद्यालयाच्या सुरक्षा रक्षकाच्या पगारवाढीबाबत चर्चा करणे

ठराव क्र. 14 – महाविद्यालयाच्या सुरक्षा रक्षकाच्या अर्जानुसार त्यांच्या वेतन वाढीचा मुद्दा मा. प्र. प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी सभेपुढे प्रस्तुत केला. त्यावर सविस्तर चर्चा झाली त्यानुसार सुरक्षा रक्षकाकडे स्वत:ची परवाना असलेली बंदूक असल्याची खात्री करुन पगार वाढीबाबत पुनर्प्रस्ताव सादर करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. खैरमोडे एच. एल.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 15 – सेवानिवृत्तीचा प्रस्ताव शासनास पाठविणेबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. 15 – महाविद्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. खैरमोडे हणमंत लक्ष्मण हे त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. तरी त्यांच्या सेवानिवृत्ती बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत सभेमध्ये विचार विनिमय करण्यात आला. त्यानुसार त्यांचा सेवानिवृत्ती प्रस्ताव शासनास सादर करणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : डॉ. बरकडे जे. डी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. 16 – महाविद्यालयाच्या स्टेजसमोर पेव्हर्स ब्लॉक बसवणे व इमारतीच्या टेरेसचे वॉटरप्रुफींग करणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. 16 – महाविद्यालयाच्या स्टेजसमोर पेव्हर्स ब्लॉक बसवणे व टेरेसचे वॉटरप्रुफींग करणेबाबत चा प्रस्ताव डॉ. भंडारे एस.जे. यांनी मांडला. त्यावर सभेमध्ये विचार विनिमय झाला त्यानुसार ही सभा उपरोक्त दोन्ही कामे करण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. कणसे पी. ए.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

# सूचना

दिनांक २६/१२/२०१८

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध च्या महाविद्यालय विकास समितीची सभा शुक्रवार दिनांक २८/१२/२०१८ रोजी ठीक 4:00 वा. महाविद्यालयामध्ये आयोजित केली आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

| | | |
|---|---|---|
| 1) आदरणीय श्रीमंत गायत्रीदेवी भगवंतराव पंतप्रतिनिधी राणीसाहेब, औंध | चेअरमन | |
| २) श्री. कणसे प्रदिप आबासो | सदस्य | |
| ३) डॉ. कोरे शैलेश मल्लाप्पा | सदस्य | |
| 4) डॉ. सरकडे जगन्नाथ दगडू | सदस्य | |
| ५) श्रीमती पोळ शुभांगी हणमंत | सदस्य | |
| ६) श्री. खरटमोल राजेश मारुती | सदस्य | |
| ७) श्री. खैरमोडे हणमंत लक्ष्मण | सदस्य | |
| ८) ॲड. श्री. क्षिरसागर अतुल रामचंद्र | सदस्य | |
| ९) श्री. माने राजेंद्र चंद्रकांत | सदस्य | |
| 10) श्री. कुंभार चंद्रकांत शंकर | सदस्य | |
| 11) श्री. तांबोळी रुस्तुम अल्लाबक्ष | सदस्य | |
| १२) श्री. निकम विकास लायाप्पा | सदस्य | |
| १३) श्री. माने आदेश शिवाजी | सदस्य | |
| 14) डॉ. भंडारे श्रीकांत जयंत | सचिव | |

Scanned with CamScanner

सभेपुढील विषय    दि. २५/१२/२०१८

१) श्री खरटमोल राजेश मारुती, रसायनशास्त्र विभाग, यांची अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक व श्री भुजबळ गणपती रामचंद्र यांची सह समन्वयक म्हणून नियुक्ती करणे बाबत विचार विनिमय करणे

२) खातेनिहाय शिल्लक निधीचा अहवाल सभेपुढे सादर करणे व आवश्यक निधी बाबत चर्चा करणे.

३) महाविद्यालयाचे शैक्षणिक, प्रशासकीय व जेंडर ऑडिट करुन घेणे बाबत विचार विनिमय करणे.

Scanned with CamScanner

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध च्या महाविद्यालय विकास समिती (CDC) ची सभा दिनांक २७/१२/२०१९ रोजी संपन्न झाली. त्याचे इतिवृत्त खालील प्रमाणे.

विषय क्र. १ : श्री राजेश मारुती खरातमोल व श्री गणपती रामचंद्र भुजबळ, रसायनशास्त्र विभाग यांची अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे अनुक्रमे समन्वयक व सहसमन्वयक म्हणून नियुक्ती करणेबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. १ : महाविद्यालयाचे अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे पूर्वीचे समन्वयक व सध्याचे प्रभारी प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांचे दोन्ही पदावर असल्यामुळे ऑनलाईन माहिती भरण्यास येणाऱ्या तांत्रिक अडचणींचा विचार करून श्री. खरातमोल राजेश मारुती व श्री. भुजबळ गणपती रामचंद्र यांच्या अनुक्रमे समन्वयक व सहसमन्वयक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, पदावरील नियुक्ती बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. त्यानुसार महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक म्हणून श्री. खरातमोल रा. मा. व सहसमन्वयक म्हणून श्री. भुजबळ ग. रा. यांच्या नियुक्तीस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.
अनुमोदक : डॉ. बरकडे जे. डी.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. २ – महाविद्यालयातील खातेनिहाय शिल्लक निधीचा अहवाल सभेपुढे सादर करणे व आवश्यक निधीबाबत चर्चा करणे.

ठराव क्र. २ – महाविद्यालयातील विविध खात्यामधून आजअखेर झालेल्या खर्चाचा अहवाल प्रभारी प्राचार्य डॉ. भंडारे सर यांनी सभेपुढे सादर केला तसेच चालू आर्थिक वर्ष संपेपर्यंत आवश्यक असलेल्या निधी बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. त्यानुसार झालेल्या खर्चास व आवश्यक असलेल्या निधीस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खैरमोडे एच. एल.
अनुमोदक : डॉ. कोरे एस. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

विषय क्र. ३ – महाविद्यालयाचे शैक्षणिक, प्रशासकीय व जेंडर ऑडिट करुन घेणेबाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. ३ – महाविद्यालयाचे नॅक पुनर्मुल्यांकन करुन घेण्याच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असलेले महाविद्यालयाचे शैक्षणिक, प्रशासकीय व जेंडर ऑडिट करुन घेणेबाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली त्यानुसार सदर ऑडिट करुन घेणेस हि सभा मंजूरी देत आहे.

सूचक: डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक: श्री. खरटमोल आर. एम.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

# सूचना

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंधच्या महाविद्यालय विकास समिती (CDC) ची सभा दिनांक २८.०५.2020 रोजी ठीक २:00 वा. महाविद्यालयात आयोजीत केली आहे तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

1) आदरणीय श्रीमंत गायत्रीदेवी भगवंतराव चेअरमन पंतप्रतिनिधी राणीसाहेब, औंध — [signature]

२) श्री. कणसे प्रदिप आबासो — सदस्य — [signature]

3) डॉ. कोरे श्रीशैल मल्लाप्पा — सदस्य — [signature]

4) डॉ. बरकडे जगन्नाथ दगडू — सदस्य — [signature]

5) श्रीमती पोळ शुभांगी हणमंत — सदस्य — [signature]

6) श्री. खरटमोल राजेश मारुती — सदस्य — [signature]

7) श्री. खैरमोडे हणमंत लक्ष्मण — सदस्य — [signature]

8) ॲड. श्री. क्षिरसागर अतुल रामचंद्र — सदस्य — [signature]

9) श्री. माने राजेंद्र चंद्रकांत — सदस्य — [signature]

10) श्री. कुंभार चंद्रकांत शंकर — सदस्य — [signature]

11) श्री. तांबोळी रुस्तुम अल्लाबक्ष — सदस्य — [signature]

12) श्री. निकम विकास नायाप्पा — सदस्य — [signature]

13) श्री. माने आदेश शिवाजी — सदस्य — [signature]

14) डॉ. भंडारे श्रीकांत जयंत — सचिव — [signature]

Scanned with CamScanner

अगेपुढील विषय    दिनांक: 25.05.2020

1) मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.
2) मास्टरसॉफ्ट सॉफ्टवेअर खरेदी बाबत चर्चा करणे
3) बी.व्होक कोर्ससाठी पुन्हा अर्ज करणेबाबत चर्चा करणे
4) महाविद्यालयात वाय फाय सुविधा बसवणे बाबत चर्चा करणे
5) बी.व्होक कोर्ससाठी व शासनाकडून मंजूर असलेल्या तासिका तत्त्वावरील पदे भरणे बाबत विचार विनिमय करणे
6) महाविद्यालयात नियमित प्राचार्य पद भरणे बाबत विचार विनिमय करणे.
7) कोविड-19 विषाणूचा प्रादुर्भाव रोखणे साठी महाविद्यालयात सोयी सुविधा उपलब्ध करणे बाबत चर्चा करणे.
8) महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समितीतील नूतन सदस्यांना महाविद्यालय विकास समितीमध्ये समाविष्ठ करणे बाबत चर्चा करणे
9) महाविद्यालयाच्या स्टेशनरी छपाई बाबत मंजूरी घेणे.

राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध च्या महाविद्यालय विकास समिती (CDC) ची सभा महाराष्ट्रातील कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे झूम ॲपद्वारे दिनांक २८.०५.२०२० रोजी ऑनलाईन संपन्न झाली. सदर बैठकीचा ID – 3467923185 व पासवर्ड 063311 असा होता. त्याचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

विषय क्र - १: मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे

ठराव क्र - १: महाविद्यालय विकास समितीची सभा दि २७/१२/२०१९ रोजी संपन्न झाली. समितीचे सचिव डॉ. भंडारे एस.जे. यांनी सदर सभेचे प्रोसिडींग वाचून दाखवले व ते कायम करण्यास ही सभा एकमताने मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. कोरे एस. एम.

अनुमोदक : श्री. खरटमोल आर. एम.

ठराव एकमताने मंजूर

विषय क्र. - २: मास्टर सॉफ्ट सॉफ्टवेअर खरेदी बाबत चर्चा करणे.

ठराव क्र - २: नॅकला सामोरे जाण्याच्या दृष्टीने व महाविद्यालयातील सर्वच प्रणाली अद्ययावत करण्याच्या दृष्टीने नविन सॉफ्टवेअर खरेदी करणे बाबतची गरज महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भंडारे एस.जे. यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली त्यानुसार मुलांच्या वाढिव फी बाबत विचार करून व त्याबाबत विद्यार्थी आक्षेप घेणार नाहीत याची खबरदारी घेऊन सदर सॉफ्टवेअर खरेदी करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. बरकडे जे. डी.

अनुमोदक : श्री. खैरमोडे एच. एल.

विषय क्र. - ३: बी.व्होक कोर्स साठी पुन्हा अर्ज करणेबाबत चर्चा करणे.

ठराव क्र - ३: महाविद्यालयास मागील वर्षी बी.व्होक. अंतर्गत तीन कोर्सेस मंजूर झाले होते. पण विद्यापीठाकडून उशिरा मिळालेल्या मान्यतेमुळे सदर कोर्सेस २०१९-२० या शैक्षणिक वर्षात सुरु करणेत आले नाहीत सदर कोर्सेस सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात सुरु करणेसाठी पुनर्प्रस्ताव यु.जी.सी. नवि दिल्ली यांना पाठविणेची गरज श्री. खरटमोल सर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली त्यानुसार सर्व आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करून हॉर्टीकल्चर सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी ही पदवी अभ्यासक्रम शुगर टेक्नॉलॉजी ही पदविका अभ्यासक्रम व लायब्ररी ऑटोमेशन

Scanned with CamScanner

ॲण्ड नेटवर्किंग हे कोर्सेस सुरु करणेसाठी पुनप्रस्ताव पाठविणेस ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. माने राजेंद्र चंद्रकांत

ठराव एकमताने मंजूर

विषय क्र. ४ : महाविद्यालयात वाय फाय सुविधा बसवणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ४ : महाविद्यालयातील विद्यार्थीना इंटरनेटची सुविधा उपलब्ध करुन देणे बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. जीओ कंपनी बरोबर केलेल्या कराराबाबतही चर्चा करण्यात आली परंतु वायफायची तातडीची निकड व एअरटेल या कंपनीच्या एजंट कडून पुरविण्यात येणाऱ्या सेवेची माहिती प्र. प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी सभेस दिली. त्यानुसार ही सभा वाय फाय सुविधा महाविद्यालयात उपलब्ध करुन देणेसाठी योग्य ती कार्यवाही करण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. निकम विकास तात्याबा

अनुमोदक : डॉ. कोरे एस. एम.

ठराव एक मताने मंजूर.

विषय क्र. ५ : बी. व्होक. कोर्स साठी आवश्यकतेनुसार पदे भरणे व शासना कडून मंजूर असलेल्या विविध विषयांच्या तासीका तत्वावरील पदे भरण्यासाठी विचारविनिमय करणे.

ठराव क्र. ५ : या सभेतील विषय क्रमांक ३ नुसार बी. व्होक कोर्सेस महाविद्यालयात सुरु करणेसाठी पुनप्रस्ताव पाठविणे व तो मंजूर झाल्यास सदर कोर्स साठी आवश्यकतेनुसार पदे भरणे तसेच महाविद्यालयातील रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र विभागासाठी शासना कडून मंजूर असलेल्या तासीका तत्वावरील पदे भरणे व संस्था पातळीवर भूगोल या विषयाच्या पदव्युत्तर विभागासाठी तासीका तत्वावर पदे भरण्याची आवश्यकता प्र. प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. या विषयावर समग्र चर्चा करण्यात आली त्यास अनुसरुन ही सभा सदर पदे भरण्यास मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खैरमोडे एच. एल.

अनुमोदक : श्री निकम व्ही. पी.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner

विषय क्र. ६ महाविद्यालयात नियमित प्राचार्यपद भरणे बाबत विचार विनिमय करणे.

ठराव क्र. ६ महाविद्यालयाचे प्राचार्यांचे पद हे गेली दोन वर्षे रिक्त आहे. नॅकच्या अनुषंगाने नियमित प्राचार्य असणे अत्यंत गरजेचे असून फारकाळ ते पद रिक्त ठेवता येत नसल्याची बाब प्रभारी प्राचार्य डॉ. भंडारे एस. जे. यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिली. त्यासाठी शासनाकडून सदर पद भरणे साठी वाढीव मुदत घेणे व तद्नंतर विद्यापीठ प्रशासनाकडून समिती मागवणे बाबत सभेमध्ये समग्र चर्चा झाली त्यानुसार ही सभा महाविद्यालयामध्ये नियमित प्राचार्य पद भरणे साठी आवश्यक ती प्रक्रिया राबविणेस मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. बरकडे जे. डी.

अनुमोदक : श्री. खैरमोडे एच. एल.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ७ : कोव्हीड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी महाविद्यालयात सोयी सुविधा उपलब्ध करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ७ : महाराष्ट्रात कोव्हीड-१९ च्या विषाणूचा प्रादुर्भाव वेगाने होत असून वेळोवेळी शासनाने व विद्यापीठाने मार्गदर्शक सूचना जारी केलेल्या असून त्यानुसार महाविद्यालयात सोयी सुविधा उपलब्ध करणे बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. महाविद्यालयाची इमारत निर्जंतुक करणे तसेच सॅनिटायझर उपलब्ध करणे इ. बाबींची आवश्यकता अधोरेखीत करण्यात आली त्यानुसार प्रत्यक्ष महाविद्यालय सुरु होण्याच्या अंतरावर अथवा तत्पुर्वी सदर सुविधा महाविद्यालयात उपलब्ध करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. माने आर. सी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

Scanned with CamScanner

विषय क्र. ८ : महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समिती मधील नूतन सदस्यांना महाविद्यालय विकास समिती मध्ये समाविष्ठ करणे बाबत चर्चा करणे.

ठराव क्र. ८ : महाविद्यालयाच्या स्थानिक व्यवस्थापन समिती मधील नवनिर्वाचीत सदस्य श्रीमंत गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी, राणीसाहेब, श्री. कणसे प्रदिप आबासो, श्री. आब्बास गणीभाई आतार, श्री. राजेंद्र चंद्रकांत माने, सौ. संगिता हणमंतराव शिंदे, श्री. राजेश मारुती खरमोडे (शि. प्र.), श्री. गणपती रामचंद्र भुजबळ (शि. प्र.) श्री. सर्जेराव यशवंत भोसले (शि. प्र.), श्रीमती जयश्री प्रल्हाद मोरे (प्र. से. प्र.) व प्राचार्य (समिती सचिव) यांना महाविद्यालय विकास समिती मध्ये समाविष्ठ करणे व विविध ठिकाणी त्यानुसार बदल करुन घेणे बाबत सभेमध्ये चर्चा झाली त्यानुसार ही सभा त्याप्रमाणे बदल करुन घेण्यास अनुमती देत आहे.

सूचक : डॉ. भंडारे एस. जे.

अनुमोदक : श्री. खैरमोडे एच. एस.

ठराव सर्वानुमते मंजूर

विषय क्र. ९ : महाविद्यालयाच्या स्टेशनरी छपाई व इतर छपाई बाबत मंजूरी घेणे.

ठराव क्र. ९ : महाविद्यालयाच्या दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणारी रजिष्टर, रजा अर्ज, दाखला पुस्तके, प्रवास बील लेटर हेड, नविन येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेणेसाठी आवश्यक असणारी माहिती पुस्तिका इत्यादि व अन्य स्टेशनरी छपाई बाबत सभेमध्ये समग्र चर्चा करण्यात आली. सदर छपाईसाठी आवश्यक अंदाजीत खर्चाबाबतही विचार विनिमय करण्यात आला त्यानुसार सदर छपाई साठी टेंडर मागविण्यास व कमी दराचे टेंडर पाहुन त्याप्रमाणे ऑर्डर देण्यास ही सभा मंजूरी देत आहे.

सूचक : श्री. खैरमोडे एच. एस.

अनुमोदक : डॉ. भंडारे एस. जे.

ठराव सर्वानुमते मंजूर

Scanned with CamScanner